# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.

## प्रेसनोट

दिनांक ०८/०३/२०२२

**“ पोलीस असल्याची बतावणी करुन स्पा मसाज सेंटरवर कार्यवाही न करण्यासाठी खंडणी मागणाऱ्या खंडणीबहाद्दराला सामाजिक सुरक्षा पथकाने केले जेरबंद .”**

दिनांक ०७/०३/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड यांचेकडे अर्जदार अविनाश शांताराम शिंदे वय २६ वर्षे धंदा स्पा चालक-मालक रा. कोपर आळी, लोहगांव ता. हवेली जि. पुणे यांनी एक इसम हा पोलीस असल्याची बतावणी करुन स्पा मसाज सेंटरवर कार्यवाही न करण्यासाठी खंडणी मागत असलेबाबत लेखी तक्रार अर्ज सादर केला होता. प्राप्त झालेल्या लेखी तक्रार अर्जावर कार्यवाही करणेबाबत मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश यांनी सामाजिक सुरक्षा विभागाचे प्रभारी अधिकारी श्री. देवेंद्र चव्हाण यांना मार्गदर्शन करुन योग्य त्या सुचना दिल्या होता.

सामाजिक सुरक्षा विभागाचे प्रभारी अधिकारी श्री. देवेंद्र चव्हाण यांनी तक्रारदार यांचेसोबत संवाद साधुन त्यांनी दिलेल्या तक्रारीचे गंभीर दखल घेत पडताळणी केली असता इसम नामे विशाल कैलास जौंजाळे वय २८ वर्षे रा. हिंजवडी रोड, शिंदे वस्ती, मारुंजी, पुणे याने तक्रारदार यांचेसोबत पोलीस असल्याचे सांगुन व स्पा मसाज सेंटरमध्ये गैरप्रकार चालत नसताना सुध्दा, तुम्ही गैरप्रकार चालवित आहात, त्यासाठी तुमच्या स्पा मसाज सेंटरवर पोलीसांची कार्यवाही न करण्यासाठी फिर्यादीस १,००,०००/- रु रोख रक्कमेची मागणी केली व पैसे न दिल्यास त्याचेकडे असलेले व्हिडिओ शुटींग व्हायरल करुन फिर्यादीच्या स्पा मसाज सेंटरची व स्पा मसाज सेंटरमध्ये कामकाज करणाऱ्या मुलींची बदनामी करेल अशी धमकी देवुन दिनांक ०४/०३/२०२२ रोजी प्रथम स्पा मसाज सेंटरमध्ये ५,०००/- रु रोख रक्कम व दिनांक ०५/३/२०२२ रोजी ऑनलाईन गुगल पे द्वारे १,०००/- रु रक्कम स्विकारली. त्यानंतर तडजोडीअंती ७०,०००/- रु रक्कमेची वारंवार मागणी करुन पैसे दिले नाहीतर पोलीसांना सांगुन पोलीस कार्यवाही करण्याची व व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देवुन ७०,०००/- रु रोख रक्कमेची खंडणी मागितल्याचा प्रकार समोर आले.

पोलीस असल्याचे बतावणी करणाऱ्या व कार्यवाही न करण्यासाठी खंडणीची वारंवार मागणी करणाऱ्या इसमाने तक्रारदार यास फोनद्वारे ७०,०००/- रु रक्कम घेवुन कोकणे चौक, पिंपळे सौदागर, पुणे येथील PIZZA HOUSE मध्ये बोलावल्याने मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त सो, गुन्हे श्री. काकासाहेब डोळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. प्रशांत अमृतकर यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सामाजिक सुरक्षा विभागाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण व पोलीस अंमलदार यांनी साध्या वेषात सापळा रचुन पोलीस असल्याचे बतावणी करुन कार्यवाही न करण्यासाठी खंडणी मागणाऱ्या खंडणी बहाद्दराला वाकड पोलीस स्टेशन हद्दीत कोकणे चौक, पिंपळे सौदागर, पुणे येथील PIZZA HOUSE येथे १५:५० वाजता सापळा रचुन तक्रारदार यांचेकडून ७०,०००/- रु रोख रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडून ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन खालील मुद्देमाल जप्त केला त्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

१) ७०,०००/- रु रोख रक्कम (तक्रारदार यांचेकडून स्विकारलेली)
२) ६,१२०/- रु रोख रक्कम
३) १०,०००/- रु किं चा एक काळ्या रंगाचा सँमसंग कंपनीचा ॲण्ड्रॉईड मोबाईल जु.वा.किं.अं.
४) १,०००/- रु किं चा एक काळ्या रंगाचा नोकिया कंपनीचा मोबाईल हॅण्डसेट जु.वा.किं.अं
५) २५,०००/- रु किं ची एक एमएच १४ एच एल ८४२९ क्रमांकाच्या पांढऱ्या रंगाच्या ॲक्टीवा

---------------------------------------------------------

**एकुण १,१२,१२०/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे **१) विशाल कैलास जौंजाळे वय २८ वर्षे रा. हिंजवडी रोड, शिंदे वस्ती, मारुंजी, पुणे** यांचेविरुध्द वाकड पोलीस स्टेशन येथे गुरनं १६७/२०२२ भादंवि कलम १७०,३८४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास वाकड पोलीस स्टेशन करीत आहे.

**गुन्हा करण्याची पध्दत** :- आरोपी इसम हा स्पा मसाज सेंटरमध्ये मसाज करण्यासाठी जायचा व थेरपिस्ट महिलांची जबरदस्तीने व्हिडीओ शुटींग घेवुन ती स्पा मसाज चालक-मालक यांना दाखवुन तुमच्या स्पा मसाज सेंटरमध्ये गैरप्रकार चालतात, मी स्वतः पोलीस आहे अशी बतावणी करुन स्पा मसाज सेंटरवर पोलीसांना कारवाई करावयास सांगतो व फोटो आणि व्हिडीओ व्हायरल करतो अशी धमकी देवुन, पोलीसांकडून कारवाई करण्याची भिती दाखवुन स्पा मसाज चालक-मालक यांचेकडून खंडणी स्वरुपात पैशाची मागणी करत असे.

**पोलीसांकडून आवाहन करण्यात येते की, ज्या स्पा मसाज सेंटर चालक-मालक यांचेसोबत अशा प्रकारच्या घटना घडलेल्या असतील त्यांनी न घाबरता आरोपीविरुध्द तक्रार देण्यासाठी समोर यावे.**

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अप्पर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. काकासाहेब डोळे, मा. सहा. पोलीस आयुक्त डॉ. श्री. प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण, सपोनि डॉ. अशोक डोंगरे, पोउपनि श्री. प्रदिपसिंग सिसोदे पोलीस अंमलदार कल्याण महानोर, संतोष बर्गे, नितीन लोंढे, योगेश तिडके, अतुल लोखंडे यांनी केली आहे.

